# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः15.07.2026** **वारःबुधवार**

---

1. भारत-ब्रिटेन सर्वसमावेशक आर्थिक व्यापार करार आजपासून लागू.
2. पश्चिम आशियातील तणावाच्या पार्श्वभूमीवर नवी दिल्लीत आंतर मंत्रालयीन बैठक.
3. ब्रिक्स देशांच्या श्रम आणि रोजगार मंत्र्यांची 12 वी परिषद आजपासून हैद्राबादमध्ये.
4. भारतीय वंशाचे नासा अंतराळवीर अनिल मेनन यांच्यासह दोन रशियन अंतरळवीर आठ महिन्यांच्या अंतराळ मोहिमेवर आणि
5. फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत उपांत्य सामन्यात फ्रांसला हरवून स्पेनची अंतिम फेरीत धडक.

**भारत-ब्रिटन करार**

भारत-ब्रिटन सर्वसमावेशक आर्थिक आणि व्यापार करार तसंच 'दुहेरी अंशदान करार' म्हणून ओळखला जाणारा सामाजिक सुरक्षा करार आजपासून लागू झाला आहे. या महत्त्वाच्या करारामुळे भारतातून ब्रिटनमध्ये होणाऱ्या 99 टक्के निर्यातीवर कोणतंही शुल्क आकारलं जाणार नाही. याचा फायदा निर्यातवाढीला होणार असून, उत्पादकांसाठी नव्या संधी निर्माण होतील आणि जागतिक मूल्य साखळीमध्ये भारताचा सहभाग अधिक दृढ होईल, असं वाणिज्य सचिव राजेश अग्रवाल यांनी काल नवी दिल्लीत माध्यमांशी बोलताना सांगितलं.

हा करार भारत आणि ब्रिटेन दरम्यानची धोरणात्मक भागीदारी अधिक दृढ करण्याच्या आणि समृद्धी निर्माण करण्याच्या सामायिक वचनबद्धतेचे प्रतिबिंब आहे. हा करार लागू होण हा भारताच्या व्यापार प्रवासातील एक निर्णायक टप्पा असून यामुळे दोन प्रमुख अर्थव्यवस्थांमध्ये भविष्याभिमुख आर्थिक भागीदारी प्रस्थापित होईल, असही अग्रवाल यांनी म्हटलं आहे.

**सोनावाल-आढावा बैठक**

होर्मुझच्या सामुद्रधुनीमध्ये दोन व्यापारी जहाजांवर झालेल्या हल्ल्यांनंतर पश्चिम आशियातील सागरी सुरक्षेबाबत चिंता वाढली आहे. या पार्श्वभूमीवर, केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनावाल यांनी काल नवी दिल्लीत एक उच्च-स्तरीय आंतर-मंत्रालयीन आढावा बैठक घेतली. यावेळी भारतीय खलाशांच्या सुरक्षेसाठी खलाशी-प्रथम हा सर्वसमावेशक उपक्रम सुरू करण्याचे आणि सर्व संबंधित विभागांच्या समन्वयातून उपाययोजना करण्याचे आदेशही त्यांनी दिले आहेत. प्रत्येक जहाजावर देखरेख ठेवण्याचे आणि या भागातील प्रत्येक बाधित भारतीय खलाशासाठी विशेष संपर्क अधिकारी नियुक्त करण्याचे आदेश दिले. होर्मुझ सामुद्रधुनीमध्ये 'एमटी अल बाहिया' आणि 'एमटी मोम्बासा' या व्यापारी जहाजांवर झालेल्या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर ही आढावा बैठक घेण्यात आली. या दोन जहाजांवरील एकूण 46 कर्मचाऱ्यांमध्ये 30 भारतीय खलाशी होते. 'एमटी अल बाहिया' वरील हल्ल्यात एका भारतीय खलाशाचा मृत्यू झाला आणि एक जण जखमी झाला.

**एस जयशंकर**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी काल ब्रूसेल्स इथ युरोपियन युनियनच्या परराष्ट्र व्यवहार आणि सुरक्षा धोरणाविषयक उच्च प्रतिनिधी काजा कल्लास यांची भेट घेतली. पश्चिम आशियातील तणावाची परिस्थिती आणि तिथे शांतता स्थिरता पुनः स्थापन करण्याच्या गरजेबाबत दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाली. असं जयशंकर यांनी समाजमाध्यमावर प्रसिद्ध केलेल्या संदेशात म्हंटल आहे.

**भारत-मालदीव**

भारत आणि मालदीवमधील मुक्त व्यापार कराराच्या वाटाघाटींची पहिली फेरी यशस्वीरित्या पार पडली असून, दोन्ही देशांतल्या द्विपक्षीय व्यापार आणि गुंतवणूक वाढीच्या दिशेने हे एक मोठे पाऊल आहे. गेल्या आठवड्यात या वाटाघाटी दूरस्थ पद्धतीने पार पडल्या. वाटाघाटींच्या अनेक मुद्द्यांवर दोन्ही देशांचं एकमत झाल्याचं वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने सांगितलं. भारत हा मालदीवचा दुसरा सर्वांत मोठा व्यापारी भागीदार आहे. या प्रस्तावित मुक्त व्यापार करारामुळे दोन्ही देशांमध्ये शाश्वत आर्थिक वाढीस हातभार लागेल आणि द्विपक्षीय आर्थिक आणि व्यापारी संबंध अधिक मजबूत होण्याची अपेक्षा आहे, असंही वाणिज्य मंत्रालयानं सांगितलं.

**परिषद**

ब्रिक्स देशांच्या श्रम आणि रोजगार मंत्र्यांची 12 वी परिषद आजपासून हैद्राबाद इथ सुरू होणार असून भारत यजमान देश म्हणून त्याच आयोजन करत आहे. केंद्रीय श्रम आणि रोजगरमंत्री मनसुख मांडवीय या बैठकीच अध्यक्षपद भूषावणार आहेत.

दोन दिवसांच्या या परिषदेत श्रम क्षेत्राचा अधिक विकास आणि सुरक्षितता वाढवण, महिलांचा सहभाग वाढवून त्यांच सक्षमिकरण करण आदि विध मुद्दयांवे चर्चा करण्यात येणार आहे. याबाबत एक संयुक्त जाहीरनामा तयार करण्याबाबत ही चर्चा होणार आहे. ब्रिक्स सदस्य देशांमध्ये कौशल्य विकास, कामगार कल्याण, श्रमिक नीती आणि रोजगार क्षेत्रात परस्पर सहकार्य वाढवण हा या परिषदेमागचा हेतू आहे .

**<u>गोयल</u>**

परदेश दौऱ्यावर असलेले भारताचे केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पीयूष गोयल स्पेनचा दौरा आटोपून काल बेल्जियमची राजधानी ब्रुसेल्स येथे पोहोचले. व्यापार, गुंतवणूक, तंत्रज्ञान, नाविन्यपूर्ण उपक्रम आणि शाश्वतता या क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करून युरोपसोबतची भारताची आर्थिक भागीदारी अधिक दृढ करण्याच्या उद्देशानं केंद्रीय मंत्री गोयल एका उच्चस्तरीय भारतीय व्यावसायिक शिष्टमंडळाचं नेतृत्व करत आहेत. गोयल यांनी बेल्जियमचे उपपंतप्रधान आणि रोजगार, अर्थव्यवस्था आणि कृषीमंत्री डेव्हिड क्लारिनव्हेल यांची भेट घेतली.

**<u>नासा - अनिल मेनन</u>**

भारतीय वंशाचे नासा अंतराळवीर अनिल मेनन आणि दोन रशियन अंतरळवीरांचा गट आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात यशस्वीपणे पोहचला आहे, अशी माहिती नासा अंतराळ संस्थेने दिली आहे. या गटाने काल भारतीय वेळेनुसार रात्री 8 वाजून 17 मिनिटांनी रशियाच्या 'सोयुझ एमएस-29' या अंतराळयानातून आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाकडे झेप घेतली. प्रक्षेपणांनंतर अवघ्या काही वेळातच हे अंतराळयान कक्षेत पोहोचले. सुमारे तीन तासांच्या कालावधीत आणि दोन प्रदक्षिणांच्या प्रवासानंतर हे यान आयएसएसच्या 'प्रिचाल' मॉड्यूलशी स्वयंचलितपणे जोडले गेले. हे अंतराळवीर पुढील 8 महिने या अंतराळ स्थानकात राहणार असून या दरम्यान तिथल्या कक्षीय प्रयोगशाळेत विविध प्रयोग करणार आहेत.

**<u>निषेध</u>**

पाकिस्तानव्याप्त जम्मू-काश्मीरमध्ये अशांतता आणि अस्वस्थता कायम आहे. या प्रदेशातील रावलकोट इथल्या ईदगाह मैदानावर काल गणवेशातील शेकडो शालेय विद्यार्थी आपल्या शिक्षकांसह आणि पालकांसह एकत्र आले होते. त्यांनी या व्याप्त प्रदेशात पाकिस्तानी लष्करानं केलेल्या दडपशाहीचा तीव्र शब्दांत निषेध केला. या विद्यार्थ्यांनी शांततेचं प्रतीक म्हणून पांढरे झेंडे फडकवले, तसेच "आंतरराष्ट्रीय प्रसारमाध्यमांनी आम्हाला प्रसिद्धी द्यावी" अशा आशयाचा मजकूर लिहिलेले फलक हाती घेऊन पाकिस्तानी लष्कराच्या विरोधात घोषणाबाजी केली.

**<u>जगन्नाथ यात्रा</u>**

ओडिशातील भगवान जगन्नाथ यांच्या उद्या होणाऱ्या जगप्रसिद्ध रथयात्रेसाठी पुरी शहर सज्ज झालं आहे. काल झालेल्या पवित्र 'नब यौवन दर्शना'नंतर, या वार्षिक रथोत्सवासाठी धार्मिक विधी, तसंच प्रशासकीय आणि सुरक्षा व्यवस्था पूर्ण करण्यात आल्या आहेत.

दरम्यान, बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्यामुळे ओडिशाच्या अनेक भागांत मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. यामुळे उद्या होणाऱ्या रथयात्रेच्या नियोजनात पावसाचा व्यत्यय येण्याची शक्यता आहे,

**<u>क्रिकेट</u>**

भारत आणि इंग्लंड यांच्यातील तीन सामन्यांच्या मालिकेतील पहिला एकदिवसीय क्रिकेट सामन्यात भारतानं इंग्लंडचा सहा गडी राखून पराभव केला.

या विजयामुळे भारतानं या मालिकेत 1-0 अशी आघाडी घेतली असून, आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील आपल्या पराभवाची मालिकाही खंडित केली आहे. बर्मिंगहॅममध्ये काल झालेल्या सामन्यात इंग्लंडनं प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतल्यानंतर, इंग्लंडचा संघ 48 व्या षटकात 258 धावांत सर्वबाद झाला. भारताकडून अक्षर पटेलनं 4 बळी घेतले. प्रत्युत्तरात, भारतीय संघानं 46 व्या षटकात सहजपणे विजयाचे लक्ष्य गाठले. आता उद्या कार्डिफ इथं दुसरा आणि रविवारी लॉर्ड्स मैदानावर तिसरा सामना होणार आहे.

**<u>फिफा</u>**

फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत अमेरिकेतल्या टेकसास इथ काल झालेल्या पहिल्या उपांत्य सामन्यात स्पे ने फ्रांस संघाला 2-0 ने हरवून अंतिम फेरीत धडक मारली आहे.

आज रात्री अर्जेंटीना आणि इंग्लंड यांच्यात होणार असून, त्यातील विजेत्या संघाबरोबर स्पेनच्या संघाची अंतिम फेरीत लढत होणार आहे.

# या बरोबरच ही राष्ट्रीय बातमीपत्र संपल, नमस्कार.